# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रोचे ३३ वे भुयारीकरण पूर्ण



मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) - कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गावरील चर्चगेट ते हुतात्मा चौक स्थानकादरम्यानचा बोगदा आज यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. या महत्त्वाकांक्षी भुयारी मार्गावरील हे ३३ वे भुयारीकरण आहे. आजवर या प्रकल्पाचे ८८ टक्के भुयारीकरण आणि ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.

चर्चगेट ते हुतात्मा चौक हे अंतर ६५३ मीटरचे आहे. सूर्या-२ या रॉबिन्स बनावटीच्या टनेल बोअरिंग मशीनद्वारे हा बोगदा खणण्यात आला. भुयारीकरणादरम्यान ५०२ सिमेंट रिंगचा वापर करण्यात आला. या भुयारीकरणाला २७५ दिवस लागले.

**चर्चगेट ते हुतात्मा चौक मेट्रो स्थानकादरम्यान बोगदा तयार**

दक्षिण मुंबई परिसरात फ्लोरा फाऊंटन व अन्य ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारतींखालून भुयारीकरण करणे हे आव्हानात्मक होते. त्यासाठी कट अॅण्ड कव्हर तसेच न्यू ऑस्ट्रीयन टनेलिंग या पद्धतींचा एकाचवेळी वापर करण्यात आला. चर्चगेट ते हुतात्मा चौक स्थानकांमुळे या परिसरातील व्यापारी केंद्रे जोडली जाणार आहेत अशी माहिती मुंबई मेट्रो रेल महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी दिली.

कफ परेड, विधान भवन, चर्चगेट आणि हुतात्मा चौक या स्थानकांचा पॅकेज-१ मध्ये समावेश आहे. या पॅकेजमध्ये ८० टक्के भुयारीकरण आणि ६८ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.